जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट ३७१ - २३ दिनांक : - २३/१०/२०२३

# ॲन्टीकरप्शन अधिकारी असल्याची बतावणी करुन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त अधिकारी यांचे राहते घरी ३५ लाख रुपयांचा दरोडा टाकणाऱ्या मोहरक्यास अटक करण्यास विरार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

रबाळे पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ३६१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९५, ४२०, १७०, ५०६(२), ३४ प्रमाणे मधील फिर्यादी नामे.श्री.कांतीलाल यादव, वय-६० वर्षे, व्यवसाय-सेवानिवृत्त, रा.ऐरोली, नवी मुंबई यांचे राहते घरी दि.२१/०७/२०२३ रोजी दुपारी ०३.५०वा. ते ०५.००वा.चे दरम्यान ०६ अनोळखी इसमांनी आपसांत संगणमत करुन, आम्ही ॲन्टीकरप्शनचे अधिकारी आहोत, तुमचे घराची घरझडती घ्यावयाची आहे अशी बतावणी करुन, फिर्यादी यांचे घरामध्ये प्रवेश करुन, घरातील रोख रक्कम, सोन्याचे दागिने, ०२ मनगटी घडयाळे, व चामडयाची बॅग असा एकुण- ३४,८५,०००/- रु.किं.चा मुद्देमाल फिर्यादी व त्यांचे पत्नीस मारहाण करुन, जिवे मारण्याची धमकी देवुन, जबरी दरोडा टाकला होता. सदर बाबत रबाळे पोलीस ठाणेचे पोलीसांनी तपास करुन ११ आरोपीतांना अटक केली होती. परंतु नमुद गुन्हयातील आरोपीतांचा मोहरक्या- अमित वारिक याचा मागील ०३ महिन्यापासुन रबाळे पोलीस सातत्याने शोध घेत होते. परंतु रबाळे पोलीसांना त्यामध्ये यश येत नव्हते.

दि.२२/१०/२०२३ रोजी रबाळे पोलीसांनी सदर गुन्हयातील आरोपीत हा विरार पोलीस ठाणे हद्दीत वास्तव्यास येणार असले बाबत माहिती देवुन, नमुद आरोपीताचा शोध घेणे बाबत कळविले होते. त्याअनुषंगाने विरार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत-अमित वारिक याचे शोधार्थ रबाळे पोलीसांकडून माहिती संकलित करुन, लागलीच गुप्त त्याबाबत बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपीताचा मागोवा घेतला असता, त्या आधारे आरोपीत नामे. अमित संजय वारिक, वय-३५ वर्षे, रा.चंदनसार, विरार पुर्व यास चंदनसार, विरार पुर्व येथील आर.के. हॉटेल जवळ, ०२ तासांचे आत यशस्वीरित्या विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाने ताब्यात घेतले आहे.

बतावणी करुन दरोडा या गुन्हयाचे गांभीर्य व संवेदनशिलता लक्षात घेवुन, मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी प्रस्तुत गुन्हयातील आरोपीत- अमित वारिक यास यशस्वीरित्या ०२ तासांचे आत ताब्यात घेवुन, महत्वपुर्ण कामगिरी केलेली आहे. नमुद आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन, त्याचेवर खंडणी, फसवणुक यासारखे मुंबई, ठाणे, आयुक्तालयात अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.अभिजित मडके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, योगेश नागरे, पोअं/संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-----ooo-----